# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.05.2026** **वारः मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काल नॉर्वेतील ओस्लो इथं भारत-नॉर्वे व्यापार आणि संशोधन परिषदेला उपस्थिती
2. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील आरोपांची चौकशी करणाऱ्या न्यायाधीश चौकशी समितीचा अहवाल लोकसभा अध्यक्षांकडे सादर
3. नीट पेपरफुटीप्रकरणी खासगी शिकवणी वर्गचालक शिवराज मोटेगावकर याला पुण्यातून अटक आणि
4. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अपघातात 13 जणांचा मृत्यू; 20 हून अधिक जखमी

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गहर स्टोर यांच्यासमवेत भारत-नॉर्वे उद्योग आणि संशोधन शिखर परिषदेला संबोधित केलं. दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीनं ही परिषद महत्त्वपूर्ण ठरली. या परिषदेला भारत आणि नॉर्वेमधील 50 हून अधिक कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

भारतातील उद्योगस्नेही वातावरण, प्रतिभावान युवा शक्ती आणि गुंतवणूकदारांसाठी अनुकूल धोरणांमुळे नॉर्वेतील कंपन्यांना भारतात मोठ्या संधी उपलब्ध असल्याचं पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. TEPA कराराची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर जहाजबांधणी, आरोग्य क्षेत्रातील नवकल्पना आणि हरित तंत्रज्ञान यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत नॉर्वेनं भारतात अधिक गुंतवणूक करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

नॉर्वेमध्ये पंतप्रधान मोदींना सर्वोच्च ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट सन्मानाने गौरवण्यात आलं.

पंतप्रधान आज ओस्लोमध्ये भारत-नॉर्डिक शिखर परिषदेलाही उपस्थित राहातील. या परिषदेचा उद्देश तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, संरक्षण, शाश्वतता आणि व्यापार यांसारख्या क्षेत्रांमध्ये नॉर्डिक राष्ट्रांसोबतची भारताची धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करणे असा आहे.

या पुढील टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आज इटलीच्या दोन दिवसांच्या भेटीवर रोममध्ये पोहोचतील आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

**<u>हनोई राजनाथ</u>**

भारत एक सामर्थ्यशाली, आत्मविश्वासू आणि सक्षम राष्ट्र असल्याचं ऑपरेशन सिंदूरमधून अधोरेखील झालं, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते काल हनोई इथं प्रवासी भारतीयांना संबोधित करताना बोलत होते. अण्वस्त्रांचा प्रथम वापर न करण्याच्या धोरणाशी भारत कटिबद्ध आहे; मात्र अण्वस्त्रांच्या हल्ल्यांबाबत कोणत्याही धमकीला भारत बळी पडणार नाही उलट प्रत्युत्तर देण्यास सज्ज असल्याचं सिंह यावेळी म्हणाले.

**<u>तोफगोळा प्रकल्प</u>**

महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात संरक्षण साहित्य उत्पादन उद्योग उभा राहत आहे. शिर्डीमधील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन येत्या 23 मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्हा, देशातील महत्त्वाचं संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित होणार असल्याची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक आणि चेअरमन रविकांत यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

**नड्डा बैठक**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल थायलंड, इराण, नेदरलँडस्, स्वीडन आणि मॉरिशस या देशांच्या आरोग्य मंत्र्यासमवेत एका उच्चस्तरीय द्विपक्षीय बैठक घेतली. जीनिव्हात होणाऱ्या 79व्या जागतिक आरोग्य परिषदेच्या पार्श्वभूमीवर या बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या संदर्भात समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, बैठकीत झालेल्या चर्चेत डिजीटल आरोग्य, औषधनिर्माण, लवचिक सार्वजनिक आरोग्य प्रणाली आणि प्रगत जागतिक आरोग्य व्याप्तीला चालना देणे आदी मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं नड्डा यांनी नमूद केलं आहे.

**केरळ मुख्यमंत्री**

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांनी काल थिरुवनंतपुरममध्ये शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. सतीशन यांच्यासह वीस  जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, नेते राहूल गांधी तसंच प्रियांका गांधी वद्रा आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, केरळचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री व्ही.डी. सतीशन यांचं अभिनंदन केलं आहे.

**न्यायमूर्ती वर्मा**

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याशी संबंधित आरोपांची चौकशी करणाऱ्या न्यायाधीश चौकशी समितीने आपला अहवाल लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे काल सादर केला. हा अहवाल दोन्ही सभागृहांमध्ये सादर केला जाणार आहे. न्यायाधीश चौकशी समितीच्या सदस्यांनी हा अहवाल बिर्ला यांच्याकडे सोपवला.

**इराण हल्ला**

कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांच्या नेत्यांनी केलेल्या विनंतीवरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी इराणवरील नियोजित लष्करी हल्ला तूर्तास स्थगित केला असल्याचं म्हटलं आहे. या संदर्भात गांभीर्यानं वाटाघाटी सुरू आहेत असं कारण ट्रम्प यांनी दिलं आहे. अमेरिका आणि पश्चिम आशियातील इतर देशांना मान्य होईल असा एखादा करार लवकरच अस्तित्वात येऊ शकतो असंही ट्रम्प यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात नमूद केलं आहे.

**अमेरिका-रशिया तेल**

अमेरिकेने रशियन तेलावरील निर्बंधांमधून दिलेल्या सवलतीचा कालावधी एका महिन्याने वाढवला आहे. अमेरिकेच्या अर्थ विभागाने काल एक आदेश जारी करून, 17 एप्रिल रोजी किंवा त्यापूर्वी समुद्रामार्गे वाहतुकीत असलेल्या रशियन तेलावरील निर्बंधांमधून दिलेल्या सवलतीची मुदत 17 जूनपर्यंत वाढवली आहे.

**लेबनान**

इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात झालेल्या संघर्षात आतापर्यंत 3 हजाराहून अधिक लोक मृत्यूमुखी पडले आहे. यामध्ये 292 महिला आणि 211 मुलांचा समावेश आहे अशी माहिती लेबनानच्या आरोग्य मंत्रालयानं दिली आहे.

**इबोला-काँगो**

काँगोमधील इतुरी आणि उत्तर किवू प्रांतांत इबोला आजारामुळे 118 जणांचा मृत्यू झाला असून, 300 संशयित रुग्णांची नोंद झाली आहे. युगांडामध्येही आरोग्य अधिकाऱ्यांनी एका मृत्यूची आणि एका संशयित रुग्णाची नोंद केली आहे. हा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं इबोलाच्या या उद्रेकाबाबत चिंता व्यक्त केली असून, आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केली आहे.

**नीट पेपर फूटी**

नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागानं लातूरच्या खाजगी शिकवणी वर्गाचा संचालक शिवराज मोटेगावकर याला काल पुण्यातून ताब्यात घेतलं. दिल्लीतील राऊज अवेन्यू न्यायालयानं त्याला 9 दिवसाची सीबीआय कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात सीबीआयनं मोटेगावकरची 11 तास चौकशी केली होती. त्यानंतर त्याच्या लातूर इथल्या प्रशिक्षण केंद्रात शोधमोहीम राबवून सीबीआयनं संशयास्पद दस्तऐवज, संगणक आणि मोबाईल फोन जप्त केले होते.

**विधान परिषद निवडणूक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या 16 जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. यासह चंद्रशेखर बावनकुळे  विधानसभेत निवडून आल्यामुळे, त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानं, रिक्त झालेल्या एका जागेसाठीही निवडणूक होणार आहे. याबाबतची अधिसूचना येत्या 25 तारखेला जारी होईल. 1 जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, तर 4 जूनपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. मतदान 18 जून रोजी होणार असून 22 जूनला मतमोजणी होईल. याबरोबरच संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

**महा-पेट्रोल-डिझेल**

महाराष्ट्रात सर्व पेट्रोल पंपांवर आणि साठवणूक केंद्रांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, लोकांनी 'घाबरून जाऊन अतिरिक्त खरेदी करू नये, असं आवाहन तेल विपणन कंपन्यांनी केलं आहे. मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत झालेली जवळपास 20 टक्क्यांची वाढ लक्षात घेता, भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांसारख्या तेल विपणन कंपन्यांनी हे आवाहन केलं आहे. घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरचाही पुरेसा साठा उपलब्ध असून, ग्राहकांच्या नोंदणीनुसार पुरवठा सुरू असल्याचं एका अधिकृत निवेदनात म्हटलं आहे.

**अपघात-पालघर**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर, पालघर जिल्ह्यातील धानीवरी जवळ, काल संध्याकाळी लग्नाच्या वऱ्हाडाचा ट्रक आणि कंटेनर एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात 13 जणांचा मृत्यू झाला असून 20 जण जखमी झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**हवामान**

देशात आज मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी तीव्र उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला आहे. किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि ओडिसामध्ये दिवसभर उष्ण आणि दमट हवामान कायम राहाण्याची शक्यता वर्तवली आहे. महाऱाष्ट्रात विदर्भ, राजस्थान, उत्तर प्रदेशच्या काही भागात रात्रीही उष्मा कायम  राहाण्याचा अंदाज वर्तवला आहे. तर अंदमान निकोबार बेटे, केरळम्, लक्ष्द्वीप, ईशान्येकडी काही राज्यांसह तामिळनाडू, पुदुच्चरी मध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. देशाच्या उर्वरीत भागातही वादळ आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवली आहे.

# या बरोबरच हे ऱाष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.